**<u>उर्वरीत उलटतपास आरोपी तर्फे  विधीज्ञ श्री.पी. बी. औताडे यांच्या तर्फे सुरु</u>**

**२२.** हे म्हणणे खरे नाही की नवनाथ बिडगर व अरुण रफायल पाटोळे हे दोघेही आरोपीची जमीन बटाईने करतात. हे म्हणणे खरे नाही की,सुभाष अप्पासाहेब पटारे यांच्याकडे ट्रॅक्टर असुन आरोपी क्र१ त्याच्यावर चालक आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९.१०.२०२२ रोजी सकाळी ९.३० वा सुभाष पटारे यांचा ट्रॅक्टर आरोपी क्र. १ घेवून नांगरण्यासाठी आला होता.

**२३.** **प्रश्न –** अमोल केशवर बिडगर, लक्ष्मण केशव बिडगर, पांडुरंग केशव बिडगर यांनी आरोपी क्र. १ ने घेवून आलेला ट्रॅक्टर अडविला?

**उत्तर** मुळात ट्रॅक्टरच आलेला नव्हता.

**२४.** हे म्हणणे खरे नाही की अमोल केशव बिडगर, पांडुरंग केशव बिडगर यांनी आरोपी क्र.१ ला ' कारे, महारडया या अगोदर मारलेले बास झाले नाही का' असे म्हणुन जातीवाचक शिवीगाळ केली.  हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस अमोल केशव बिडगर, लक्ष्मण केशव बिडगर, पांडुरंग केशव बिडगर यांनी आरोपी क्र. १ ला लाकडी दांडयाने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस सुभाष पटारे व अंकुश पटारे हे तिथे आले व त्यांनी आरोपी क्र. १ ची सोडवणुक केली.

**प्रश्न –** आरोपी क्र.१ ने श्रीरामपूर पोलिसस्टेशन येथे गु.र.न ३८७/२०२२ नुसार अमोल केशव बिडगर, लक्ष्मण केशव बिडगर, पांडुरंग केशव बिडगर विरोधात तक्रार केलेली आहे?

**उत्तर –** हो, आमच्यावर हल्ला केल्यावर बनावटी केस केलेली आहे.

**२५.** गु.र.नं ३८७/२०२२ खोटी तक्रार असल्यामुळे रद्द करुन मिळण्यासाठी कारवाई करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०६.२०२१ रोजी  अमोल केशव बिडगर, लक्ष्मण केशव बिडगर, पांडुरंग केशव बिडगर व मी आरोपी क्र. १ वांगी बुाा येथून चालला असता त्याला अडवून त्याची चेन काढून त्याला मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ने आमच्या विरुध्द गु.र.नं  I१५९/२०२१ दाखल केलेला आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो

की, बनावट आहे.   गु.र.नं I १५९/२०२१ खोटी तक्रार आहे म्हणुन ती रद्दबादल करुन मिळण्यासाठी पोलिसांकडे तक्रार केली व त्यासंदर्भात माझा मुलगा सांगू शकतो मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ला दिनांक १८.०८.२०२१ रोजी धमकी दिल्याने माझ्या विरुध्द व माझ्या मुलां विरुध्द तक्रार दाखल झाली.

**२६.** हे म्हणणे खरे आहे की, गट नं ३५ मधुन माझ्या शेतीमध्ये चारी लगत आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या चारीला 'बारा चारी' म्हणतात. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९.१०.२०२२ ला आरोपी क्र.१ याने माझ्या विरुध्द फिर्याद दिली म्हणून मी व माझे कुटुंब ट्रॅक्टर मध्ये बसुन चारीने चाललो होतो. हे म्हणणे खरे नाही की ट्रॅक्टर मधून जात असताना ट्रॅक्टर पलटी होवून मला व माझ्या मुलांना व पत्नीला मार लागला.

**प्रश्न –** गट नं ३५ वादाकिंत जमीनीचा व्यवहार झालेला नाही तरी आरोपी क्र.१ धमकावत होता की, ‘ तुम्ही मला सहा एकर जमीन दया नाहीतर तुमच्या कुटूंबाला संपवुन टाकेल.’

**उत्तर –** खरे नाही, जमीनीचा व्यवहारच होवू शकत नाही.

**२७.** हे म्हणणे खरे नाही की, याच कारणांवरुन सचिन दांडगे त्याच्या साथीदारांसोबत मला कायमच दमदाटी करत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी सकाळी ६.३० ते ४.४५  च्या दरम्यान माझा मुलगा लक्ष्मण याच्या फोनवर सचिन दांडगे यांनी फोन केला होता व तो फोन माझ्या पत्नीने उचलला असता 'घरातील सर्व लोक कुठे आहेत'? असे सचिन दांडगेने विचारले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने सचिन दांडगेला फोनवर सांगितले नव्हते की, ' सर्वजन घरी आहेत.’

**२८.** हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळेस सचिन दांडगे (  आरोपी क्र. २ ) याने माझा मुलगा अमोल याच्या पायावर कु–हाड मारली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सर्व आरोपींनी माला लाथाबुक्यांनी मारहान केली नाही, त्यामुळे माझ्या पायाला मार लागला नाही,तसेच अंगाला दुखापत झाली नाही.  हे म्हणणे खरे नाही की, मारहाणीच्या वेळेस माझी सुन मध्ये पडली नाही व तिला सुध्दा आरोपींनी मारहान केली नाही. हे म्हणणे

खरे नाही की, आरोपींनी माझ्या सुनबाईच्या पत्नीच्या गळयातुन माळ, मंगळसुत्र ओढुन गहाळ केले.

**२९.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या विरुध्द व माझ्या मुलां विरुध्द ब–याच केसेच चालु आहेत. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, आरोपींनेच केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, संक्षीप्त फौजदारी खटला क्र. २०५/२०२२ माझ्या विरुध्द दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही की, नियमित दिवाणी दावा २७५/२०२१ विलास होन ने माझ्या विरुध्द दाखल केलेला आहे.

**३०.** हे म्हणणे खरे आहे की माझ्या व माझ्या तीन्ही मुलांविरोधात भारतीय दंड विधान १८६० कलम ४३५ सह कलम ३४ अन्वये नियमित फौजदारी खटला क्र. ४२१/२३ उसाचे पिक जाळल्याबद्दल गुन्हा दाखल आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, ते खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या केसमध्ये आरोपी नवनाथ बिडगर (आरोपी क्र. ३) साक्षीदार आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र.३ सदर प्रकरणात साक्षीदार असल्यामुळे व वादांकित जमीन आरोपी क्र. ३ गट नं ३५ मध्ये अरुण पाटोळे, नागरमल व विलास होन यांचे क्षेत्र नवनाथ बिडगर व बाजीराव ठोंबरे हे कसतात म्हणुन आरोपी क्र. ३ वर आमचा रोष आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र.१ ने आमच्या विरुध्द केस केल्याने त्याच्या विरुध्द माझ्या मनात राग आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, खोटया केसेस केल्या आहेत, म्हणुन मनात राग असणारच. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ आरोपी क्र. १ व ३ चा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ आरोपी क्र. १ व ३ चा मित्र असल्यामुळे त्याला विनाकारण खोटया केसमध्ये गोवले आहे.

**३१.** हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी केलेल्या केसेसना शह देण्यासाठी माझ्या पत्नीने खोटया केसेस दाखल केलेल्या आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती....**

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2025.09.22 18:04:51 +0530

**(व्ही.एन.काटकर)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.४, श्रीरामपूर.**

**दिनांक–२२.०९.२०२५**